**महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१४/प्र.क्र.१७०/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २ जून, २०१५

वाचा -

१) **शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.**
२) **शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१४/१५-१६/३०१/२३३, दिनांक १४ जानेवारी, २०१५.**

प्रस्तावना -

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता नविन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जा वाढ करणे याकरिता दिनांक ३१ जुलै, २०१४ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरीता प्राप्त झालेल्या एकूण ४२३६ प्रस्तावांपैकी १०८५ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या **विवरणपत्रामध्ये** दर्शविलेल्या १०८५ शाळांना ,शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन **परवानगी** देत आहे .

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे**.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळांच्या व्यवस्थापनांनी **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे **परवानगी (इरादा पत्र)** देण्यात येत आहे.

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१५-१६ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन किंवा दर्जावाढ करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र** (N.O.C.) मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत** (N.O.C.) प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या **विवरणपत्रातील** यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ** शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) **महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२** (सन २०१३ चा ०१) मधिल सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश सर्व व्यवस्थापन/संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती

भरताना, "***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता **" स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा"** असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०६०३१०३०४१२८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(राजेंद्र पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. सर्व शिक्षण निरीक्षक (पश्चिम / उत्तर / दक्षिण) बृहन्मुंबई.
१०. संबंधित प्रशासन अधिकारी, महानगर पालिका/नगर परिषद/नगर पालिका
११. निवडनस्ती (एसएम २).

| महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियमन २०१२ अंतर्गत कलम ७ (१) अन्वये नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता परवानगी दिलेल्या शाळांच्या नावांची यादी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| शासन निर्णय क्रमांक एसएफएस-१०१४/प्र.क्र.१७०/एसएम- २, दिनांक २ जून, २०१५ चे सहपत्र | | | | | | |
| अ. क्रं. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| मुंबई विभाग | | | | | | |
| १ | मुंबई पश्चिम | स्टॅनिसलॉस इन्स्टिटयूशन | सेंट स्टयानिसलॉस हायस्कूल, बांद्र प | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २ | मुंबई पश्चिम | सॅक्रेड हार्ट चर्च | सॅक्रेड हार्ट आयजीएससीई स्कूल, सांताक्रुझ प | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| ३ | मुंबई पश्चिम | श्री. चंदुलाल नानावटी वुमेन्स् इंन्स्टिटयूट ॲण्ड गर्ल्स् हायस्कूल | श्री. चंदुलाल नानावटी विनयमंदिर, विलेपार्ले प | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ४ | मुंबई पश्चिम | नर्सी मोनजी एज्युकेशनल ट्रस्ट | जमनाबाई नर्सी इंटरनॅशनल स्कूल, जुहू | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ५ | मुंबई पश्चिम | चिल्ड्रन वेल्फेअर सेंटर ट्रस्ट | चिल्ड्रन वेल्फेअर सेंटर, ओरलेम, मालाड (प) | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| ६ | मुंबई पश्चिम | श्री. नूतन केलवानी मंडळ | अस्पी नूतन ॲकडमी, मालाड (प) | नवीन शाळा | प्राथमिक ते माध्यमिक | इंग्रजी |
| ७ | मुंबई पश्चिम | ओरियंट ट्रस्ट | जेबीसीएन इंटरनॅशनल स्कूल, बोरीवली प | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ८ | मुंबई पश्चिम | एम्पायर फाऊडेशन | विब्गोर हाय, बारीवली प | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ९ | मुंबई पश्चिम | सेंट जोसेफ एज्युकेशन आणि मेडीकल रिलिफ सोसायटी | सेंट जोसेफ कॉव्हेंट इंटरनॅशनल स्कूल, बांद्रा (प) | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| १० | मुंबई पश्चिम | सेंट ॲन हायस्कूल टस्ट | सेंट ॲन इंटरनॅशलन स्कूल, मालाड (प) | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| ११ | मुंबई पश्चिम | वारेज एज्युकेशनल ट्रस्ट | श्रीम. आशाबाई तुळशीराम वारे इंग्लिश हायस्कल, मालाड (पु) | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी |
| १२ | मुंबई पश्चिम | चंद्रा एज्युकेशलन ट्रस्ट | सर जे. पी हायस्कूल, मालाड (प) | दर्जावाढ | उच्च प्राथमिक | इंग्रजी |
| १३ | मुंबई पश्चिम | गुंडेचा चॅरिटीज | गुंडेचा एज्युकेशन ॲकॅडमी, कांदिवली (पुर्व) | नवीन शाळा | उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| १४ | मुंबई पश्चिम | अंजुमन ए तन्झेमुल मुस्लीमीन | मापखान इंग्लिश हायस्कूल, अंधेरी पु | दर्जावाढ | माध्यमिक | इंग्रजी |
| १५ | मुंबई पश्चिम | सिद्दिकी एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर ट्रस्ट | रोझ मेरी इंग्लिश हायस्कूल, मालाड (प) | दर्जावाढ | माध्यमिक | इंग्रजी |
| १६ | मुंबई पश्चिम | झेनिथ एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर टर्स्ट | होली मदर इंग्लिश स्कूल, मालवणी, मालाड (प) | दर्जावाढ | माध्यमिक | इंग्रजी |
| १७ | मुंबई पश्चिम | सेंट रॉक्स् एज्युकेशनल ट्रस्ट | सेंट रॉक्स हायस्कूल ज्यु. कॉलेज, अंधेरी (पु) | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (वाणिज्य) | इंग्रजी |
| १८ | मुंबई पश्चिम | सुखराज बी नाहर चॅरिटेबल ट्रस्ट | नाहर इंटरनॅशनल स्कूल, अंधेरी पुर्व | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (विज्ञान) | इंग्रजी |
| १९ | मुंबई पश्चिम | द मोमिन गुजराज असासिएशन | मदनी हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज फॉर गर्ल्स् जोगेश्वरी (प), मुंबई १०२ | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (वाणिज्य) | इंग्रजी |
| २० | मुंबई पश्चिम | अल कलाम एज्युकेशनल ट्रस्ट | द स्कॉलर्स् ज्यु. कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, जोगेश्वरी प | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (वाणिज्य) | इंग्रजी |
| २१ | मुंबई पश्चिम | तालुकदार्स् एज्युकेशनल ॲण्ड वेल्फेअर सोसायटी | फा. अब्रहम ज्युनिअर कॉलेज, मालाड (प) | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (विज्ञान व वाणिज्य) | इंग्रजी |
| २२ | मुंबई पश्चिम | के. श्री. बलिभद्र सिंह शिक्षण संस्थान | सर जे. पी ज्युनिअर कॉलेज, मालाड (प) | दर्जावाढ | उच्च माध्यमिक (विज्ञान व वाणिज्य) | इंग्रजी |

| अ. क्रं. | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | प्रस्तावित शाळेचे नाव व ठिकाण | नवीन शाळा/ दर्जावाढ | प्रकार | माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| २०५ | पुणे | श्री.लक्ष्मी - नृसिंह सेवाभावी प्रतिष्ठान, मु.पो.निरा-नरसिंहपुर, ता.इंदापुर, जि.पुणे, पिन-४१३२११ | श्री.शिव पार्वती इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.निरा-नरसिंहपुर, ता.इंदापुर, जि.पुणे, पिन-४१३२१ | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २०६ | पुणे | कसेगाव एज्युकेशन सोसायटी, कासेगाव, c/o राजारामबापु इस्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी राजारामनगर ता.वाळवा, जि.सांगवी, | विदयानिकेतन इंग्लिश मिडियम स्कुल सी.बी.एस.सी.पॅअर्न जांबे, ता.मुळशी, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २०७ | पुणे | दयानंद निळोबा फंड फाऊंडेशन, गट नं. १०२८, जुना भांबार्डे रोड, खंडोबा मंदिराजवळ, रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि.पुणे - ४१२२०९ | उज्जवल इंटरनॅशनल स्कुल, गट नं. १०२८, जुना भांबार्डे रोड, खंडोबा मंदिराजवळ, रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि.पुणे - ४१२२०९ | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २०८ | पुणे | किलबिल एज्युकेशन सोसायटी, २४६, जाणवडी, पुणे - ४११०१६ | किलबिल लर्निग स्कुल, वढु खु.,वडगावशेरी ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २०९ | पुणे | वसंत वेलफेअर फाऊंडेशन, पल्टॅट नं.१६,C - १, विश्रांत सोसायटी, विश्रांतवाडी, आळंदी रोड, पुणे - ४११०१५ | स्मार्ट किडस प्रायमरी स्कुल, डोमखेळ वस्ती, आव्हाळवाडी, पोस्ट वाघोली, ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २१० | पुणे | विदया विकास एज्युकेशन सोसायटी, हाऊस नं.१४८३, मु.पो.रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०९ | श्री. महागणपती ग्लोबल स्कुल, मु.पो.रांजणगाव गणपती, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०९ | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २११ | पुणे | शिक्षण प्रसारक मंडळ, रेन्बो इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.तळेगाव ढमढेरे, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०८ | रेन्बो इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.तळेगाव ढमढेरे, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०८ | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २१२ | पुणे | विंश्व प्रतिष्ठान इंदापुर, ६५१, पंचवटी हाऊसिंग सोसायटी, एम.एस.ई.बी.समोर, ता.इंदापुर, जि.पुणे, पिन - ४१३१०६ | जिजाऊ इंस्टिटयुट, कालठण नं. १, ता.इंदापुर, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २१३ | पुणे | यशवंत ग्रुप ऑफ इंस्टिटयुट, मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे, पिन - ४१२३०७ | आर्या इंग्लिश मिडियम स्कुल, मांजरी बु., ता.हवेली, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २१४ | पुणे | अनंत आशा प्रतिष्ठान, मु.पो.खडकी, ता.दौंड, जि.पुणे, पिन -* ४१३१३० | अनंत-आशा इंटरनॅशनल स्कुल, मु.पो.खडकी, ता.दौंड, जि.पुणे | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २१५ | पुणे | श्री.विठठल शिक्षण प्रसारक मंडळ, मु.पो.विठठलवाडी, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०८ | सनराईस इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.विठठलवाडी, ता.शिरुर, जि.पुणे, पिन - ४१२२०८ | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |
| २१६ | पुणे | अनंत एज्युकेशन सोसायटी, मु.पो.पळशी, ता.बारामती, जि.पुणे, पिन - ४१३१०२ | अनंत आशा इंग्लिश मिडियम स्कुल, मु.पो.पळशी, ता.बारामती, जि.पुणे, पिन - ४१३१०२ | नवीन शाळा | प्राथमिक ते उच्च माध्यमिक | इंग्रजी |
| २१७ | पुणे | जुन्नर बॉईज होम, मिशन बंगला, कल्याण पेठ, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे - ४१०५०२ | जे.बी.एच.इंटरनॅशनल स्कुल, मिशन बंगला, कल्याण पेठ, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे - ४१०५०२ | नवीन शाळा | प्राथमिक | इंग्रजी |